महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

https://jeevandeepvarta.com

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

रविवार ■ 26 जानेवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 212 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024




## संपादकीय

### प्रजासत्ताक दिनी संकल्प करुया आदर्शवत विचार कृतीत आणूया!

रविंद्र घोडविंदे

भारताचा प्रजासत्ताक दिन आपला राष्ट्रीय सण आज सर्वत्र थाटामाटात साजरा होत आहे. प्रत्येक भारतीय नागरिकास प्रजासत्ताकाचा आभिमान आणि स्वाभिमान आहे. 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय आदर्शवत संविधानाने प्रजासत्ताक राज्यकारभार कृतीत आला. येथील प्रत्येक भारतीयास संविधानाने दिलेले हक्क आणि कर्तव्या नुसार अधिकार मिळाले खऱ्या अर्थाने प्रजेचे राज्य सुरु झाले. प्रजासत्ताकाचा अमृत महोत्सव आपण आनंदाणे उत्सवाने साजरा करताना, हे प्रजासत्ताक राष्ट्र निर्मितीत, इंग्रजाच्या जुलमी सत्तेला उलथून टाकण्यासाठी अनेकांनी हौतात्म्य पतकर्ले, अनेकांनी कारावासा भोगले, संघर्ष करून मिळवलेले हे स्वातंत्र्य, आणि प्रजासत्ताक राष्ट्रात आज हक्क आणि कर्तव्याचा विसर पडतो आहे.याचे भान प्रत्येक भारतीयांनी ठेवणे गरजेचे आहे. 75 वर्षाच्या प्रजासत्ताकात देशाची आत्मनिर्भर भारत म्हणून विकासात्मक होणारी प्रगती, जगाला लाजवेल अशीच आहे. सर्वच क्षेत्रात आज भारत स्वतःचा ठसा निर्माण करत आहे. उद्याच्या बळशाली भारतासाठी प्रत्येक भारतीयांनी देशाच्या सर्वांगीन विकसासाठी, प्रगतीसाठी संविधानातील हक्का सोबत कर्तव्य पालन करण्याचा संकल्प करूया.

तिरंगा झेंडा नभी फडकवू या
संविधानाचा संकल्प पूर्ण करूया.
स्वातंत्र्य समता बंधुता नांदवूया
देशाच्या प्रगतीची कास धरूया
प्रजासत्ताक दिनी संकल्प करुया
आदर्शवत विचार कृतीत आणूया!

पुन्हा एकदा सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!




# केंद्र सरकारकडून पद्म पुरस्कारांची घोषणा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई : केंद्र सरकारने आज (२५ जानेवारी) प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पद्म पुरस्कारांची घोषणा केली आहे. यामध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला आहे. या पुरस्कारांमध्ये देशातील विविध ठिकाणी आणि विविध क्षेत्रात काम करणाऱ्या दिग्गजांचा समावेश आहे. आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येच्या भाषणानंतर या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.

पुरस्कारांमध्ये स्वातंत्र्यसैनिक, शेतकरी आणि पॅरालिम्पियनमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा समावेश आहे. या पुरस्कारामध्ये महाराष्ट्रातील मारूती चित्तमपल्ली, होमिओपॅथी चिकित्सक डॉ. विलास डांगरे यांचा समावेश आहे. या बरोबरच शैली होळकर, डॉ.नीरजा भाटला, भीमसिंह भावेश, थविल वादक पी.दत्चनमूर्ती, शेखा एजे अल सबा, एल हँगथिंग, भैरूसिंग चौहान, जगदीश जोशीला, सेनानी लिबिया लोबो सरदेसाई, हरविंदर सिंग यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने एक्सवर दिलं आहे.

> **डॉ नीरजा भटला, भीम सिंग भावेश, पी दत्तचनमूर्ती आणि एल हंगथिंग यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. कर्करोग विशेषज्ञ डॉ. नीरजा, सामाजिक कार्यकर्ते भीम सिंग, पी. दत्तचनमूर्ती हे थाविल खेळाडू आहेत आणि एल. हंगथिंग हे शेतकरी आहेत. त्यांच्या अद्वितीय कार्याने समाजाला मोलाचा फायदा झाला. त्यांच्या या कार्यासाठी त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.**

दरम्यान, भारतातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक असलेल्या पद्म पुरस्कारामध्ये पद्म विभूषण, पद्म भूषण आणि पद्मश्री पुरस्कारांचा समावेश असतो. या पुरस्कारांची घोषणा झाल्यानंतर राष्ट्रपतींच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात येत असते. आज जाहीर झालेल्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील होमिओपॅथी चिकित्सक डॉ.विलास डांगरे यांच्यासह मारुती चितमपल्ली, चैत्राम पवार यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.


दरम्यान, डॉ.विलास डांगरे हे होमिओपॅथिक डॉक्टर आहेत. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून वैद्यकीय सेवा देत आहेत. त्यांनी आतापर्यंत जवळपास एक लाखांपेक्षा जास्त रुग्णांवर उपचार केले आहेत. ते गरीब आणि सर्वसामान्य रुग्णांवर उपचार करतात. त्याचबरोबर मारुती चितमपल्ली यांनाही पद्मश्री जाहीर झाला आहे. मारुती चितमपल्ली हे ज्येष्ठ साहित्यिक आहेत. तसेच चैत्राम पवार यांनाही पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. ते वन आणि वन्यजीवाच्या संवर्धनासाठी काम करतात.

# अशोक सराफ, मनोहर जोशी यांना पद्म पुरस्कार

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

नवी दिल्लीः प्रसिद्धीची आस न बाळगता सेवेचे असिधारा व्रत घेतलेल्या चेहऱ्यांना जगासमोर आणण्याची परंपरा केंद्र सरकारने याही वेळी पद्म पुरस्कार निवडीतून जपली आहे. महाराष्ट्रातील अरण्यऋषी म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ वन्यजीव अभ्यासक व लेखक मारुती चितमपल्ली, नाडीपरिक्षेतून रोगनिदान आणि गरिबांवर नाममात्र दरात औषधोपचार करणारे होमिओपथी डॉक्टर विलास डांगरे, १०२ वर्षांच्या गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्ययोद्धया लिबिया लोबो सरदेसाई आणि पर्यावरणविषयक कार्यकर्ते चैत्राम पवार यांच्यासह विविध क्षेत्रांमधील २४ हून अधिक सेवाव्रतींना पद्म पुरस्कार जाहीर झाले आहेत. महाराष्ट्रातून द्रातून ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, दिवंगत नेते मनोहर जोशी, पंकज उदास, शेखर कपूर, अच्युत पालव, अरुंधती भट्टाचार्य, अश्विनी देशपांडे, चैतराम पवार, मारुती चित्तमपल्ली, वासुदेव कामत, सुभाष शर्मा, राणेंदर भानू माजुमदार, सुभाष शर्मा, विलास डांगरे यांना पद्म पुरस्कार जाहीर करण्यात आलेले आहेत.

- मारुती चित्तमपल्ली साहित्य
- महाराष्ट्र विलास डांगरे आरोग्य (होमिओपॅथी)
- महाराष्ट्र चैतराम पवार साहित्य
- महाराष्ट्र पंडीराम मांडवी हस्तकला
- छत्तीसगड राधा बहीन भट्ट समाजकार्य
- उत्तराखंड सुरेश सोनी समाजकार्य (आरोग्य)
- गुजरात जॉयनाचरन बथारी कला (लोककला)
- आसाम निर्मलादेवी कला (सुजनी)
- बिहार व्यंकप्पा सुगतेकर कला (गोंधळ)
- कर्नाटक जुमडे योमगाम गॅमलिन समाजकार्य
- अरुणाचल प्रदेश हरिमन शर्मा कृषी
- हिमाचल प्रदेश नरेन गुरुंग कला (गायन)
- सिक्कीम शेख ए. जे. अल सबाह आरोग्य (योग)
- कुवेत भैरूसिंग चौहान कला (निर्गुण गायन)
- मध्य प्रदेश जगदीश जोशिला साहित्य-शिक्षण
- मध्य प्रदेश एल. हांगथिंग कृषी
- नागालँड पी. दतचनामूर्ती कला (संगीत)
- पुद्दुचेरी भीमसिंह भावेश समाजकार्य
- बिहार हरविंदरसिंग क्रीडा (पॅरालिम्पियन)
- हरियाना जोनास मसेत्ती अध्यात्म
- ब्राझील लिबीया लोबो सरदेसाई समाजकार्य
- गोवा गोकुळचंद्र डे कला (संगीत)
- पश्चिम बंगाल सॅली होळकर (वस्त्रोद्योग)
- मध्य प्रदेश बातूल बेगम कला
- राजस्थान वेलू आसान कला
- तमिळनाडू डॉ. नीरजा भाटला आरोग्य
- दिल्ली हघ गॅटेझर पर्यटन
- उत्तराखंड गॅलिन गॅटेझर पर्यटन
- उत्तराखंड अच्युत पालव
- अरुंधती भट्टाचार्य
- अशोक सराफ
- अश्विनी देशपांडे
- पंकज उदास



## वैद्यकीय सेवा क्षेत्रातील योगदानाबद्दल विलास डांगरे यांना पद्मश्री

विलास डांगरे हे ७० वर्षीय दृष्टिहीन होमिओपॅथी डॉक्टर आहेत. तब्बल पाच दशकांहून अधिक काळापासून ते गरीब रुग्णांवर नाममात्र दराने उपचार करत आहेत. नागपूरमध्ये 'डॉ. विलास डांगरे होमिओपॅथी क्लिनिक सुरू करून त्यांनी एक लाखांहून अधिक रुग्णांचे उपचार केले आहेत. त्वचाविकार आणि मानसिक आजारांवरील उपचारांमध्ये विशेष प्रावीण्य असलेले डॉ. डांगरे नाडी तपासून रोगनिदान करत असल्याने त्यांचे उपचार अधिक प्रभावी ठरले आहेत. अन्य डॉक्टरांनाही त्यांनी प्रशिक्षण दिले असून दृष्टी कमी झाल्यानंतरही ते रुग्णसेवेमध्ये कार्यरत आहेत.

## महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदक

मुंबई : प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला अप्पर पोलीस महासंचालक डॉ. रवींद्रकुमार सिंगल, महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, महानिरीक्षक सुनील फुलारी, कमांडंट रामचंद्र केंदे यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. महानिरीक्षक संजय दराडे, महानिरीक्षक आरती सिंह यांच्यासह महाराष्ट्रातील ३९ पोलीसांना गुणवर्तापूर्ण सेवेसाठी पदक जाहीर करण्यात आले आहे. देशात पोलीस, अग्निशमन सेवा, गृहरक्षक आणि नागरी संरक्षण आणि सुधार सेवेतील एकूण ९४२ कर्मचाऱ्यांना शौर्य/सेवा पदके जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये पोलीस दलासाठी एकूण ७९७ पदकांचा समावेश आहे. महाराष्ट्र पोलीस दलाला एकूण ४३ पदके मिळाली आहे. राज्य पोलीस दलातील अप्पर महासंचालक डॉ. रवींद्रकुमार सिंगल, महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, महानिरीक्षक सुनील फुलारी आणि कमांडंट रामचंद्र बाबू केंडे यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे.

### राज्याला शौर्य पदक नाही

केंद्रीय गृहविभागाने यावेळी ९५ शौर्य पदके जाहीर केली आहेत. ७८ पोलीस कर्मचारी आणि १७ अग्निशमन सेवा कर्मचाऱ्यांना ही पदके प्रदान करण्यात येणार आहेत. नक्षलग्रस्त भागातील २८ जणांचा, जम्मू आणि काश्मीरमधील २८ जणांचा यात समावेश आहे. पण, महाराष्ट्राला एकही शौर्य पदक मिळालेले नाही.






## गीतासार



तमुवाच हृषीकेशः
प्रहसन्निव भारत ।
सेनयोरुभयोर्मध्ये
विषीदन्तमिदं वचः ॥२- १०॥

हे भरतवंशी धृतराष्ट्र महाराज, अंतर्यामी भगवान श्रीकृष्ण दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी शोक करणाऱ्या त्या अर्जुनाला हसल्यासारखे करून असे म्हणाले ॥ २-१० ॥

श्रीभगवानुवाच
अशोच्यानन्वशोचस्त्वं
प्रज्ञावादांश्च भाषसे ।
गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति
पण्डिताः ॥२- ११॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, हे अर्जुना, तू ज्यांचा शोक करू नये, अशा माणसांसाठी शोक करतोस आणि विद्वानांसारखा युक्तिवाद करतोस. परंतु ज्यांचे प्राण गेले आहेत त्यांच्यासाठी, आणि ज्यांचे प्राण गेले नाहीत, त्यांच्यासाठीही विद्वान माणसे शोक करीत नाहीत. ॥ २-११ ॥

न त्वेवाहं जातु नासं न
त्वं नेमे जनाधिपाः ।
न चैव न भविष्यामः सर्वे
वयमतः परम् ॥२- १२॥

मी कोणत्याही काळी नव्हतो, तू नव्हतास किंवा हे राजेलोक नव्हते, असेही नाही. आणि यापुढे आम्ही सर्वजण असणार नाही, असेही नाही. ॥ २-१२ ॥

**रेसिपी**

## मटार कटलेट



दररोज नाश्त्यासाठी नवनवीन पदार्थ कोणते करायचे, असा प्रश्न पडतो. अशावेळी तुम्ही झटपट होणारे टेस्टी मटार कटलेट नक्कीच ट्राय करू शकता. चला तर मग पटकन लिहून घ्या मटार कटलेटची सोपी रेसिपी

साहित्य:

२ वाटी मटार
२ वाटी मका
१-२ उकडलेले बटाटे
१/२ वाटी भिजवलेले पोहे
२ चमचा आल-लसूण पेस्ट
१/२ वाटी रवा
३-४ मिरच्या
कोथिंबीर

मटार कटलेट बनवण्याची कृती:


सर्वप्रथम मटार आणि मका पाण्यात उकळवून घ्या आणि यानंतर मटार आणि मका मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्या.

आता एका प्लेटमध्ये मटार, मका, उकडलेला बटाटा, आलं-लसूण पेस्ट, भिजवलेले पोहे, चिरलेली कोथिंबीर एकजीव करून घ्या.

तयार मिश्रणाचे कटलेटच्या आकारात गोळे तयार करून घ्या आणि पॅनमध्ये तेल गरम करण्यास ठेवावे.

त्यानंतर गरम तेलात कटलेट रव्यात घोळवून शॅलो फ्राय करून घ्या.

तयार गरमा गरम मटार कटलेट सॉसबरोबर सर्व्ह करा.



## स्मरणशक्ती वाढवण्यासाठी उपाय

डॉ. नागपाल सांगतात की, स्मरणशक्ती टिकवून ठेवण्यासाठी सर्वांत महत्वाचा घटक म्हणजे लक्ष. "आजच्या व्यग्र जगात अनेकांना लक्ष केंद्रित करणे कठीण होते. जर एखाद्याचे लक्ष विचलित झाले असेल, जसे की मल्टीटास्किंग करताना असेल किंवा एका वेळी अनेक कामं करताना एकाही कामात लक्ष केंद्रित होत नाही. अशा वेळी स्मरणशक्ती कमी होते.

रोजच्या ६ सवयी ज्या नैसर्गिकरीत्या स्मरणशक्ती सुधारू शकतात नियोजन करा : दैनंदिन नियोजन ठेवल्याने महत्त्वाची कामे विसरणे टाळण्यास मदत होते. तसेच रोज लेखन करावे, लेखन मेंदूला गोष्टी अधिक तपशीलवार लक्षात ठेवण्यास उत्तेजित करते.

पुरेशी झोप घ्या : स्मरणशक्ती वाढवण्यासाठी शांत झोप लागणं, झोप पूर्ण होणं आवश्यक असते. ६ ते ८ तास झोप घेतल्यास मेंदू ताजातवाना होतो. विस्मरणाची सवय कमी होते. चांगल्या आणि पुरेशा झोपेमुळे स्मरणशक्ती वाढते.

लक्ष केंद्रित करून व्यत्यय कमी करा : हातातील कामाकडे लक्ष देऊन आणि मल्टीटास्किंग टाळून, एका वेळी एक काम याप्रमाणे प्रत्येक काम व्यवस्थित करा.

मानसिक व्यायामाचा सराव करा : मेंदूला उत्तेजित करणाऱ्या क्रियाकलाप जसे की कोडे सोडवणे, वाचणे किंवा नवीन कौशल्ये शिकणे, मेंदूच्या क्रियाकलापांना चालना देत मजबूत केल्याने स्मरणशक्ती सुधारू शकते.

पुरेसा रक्तपुरवठा – सतत विस्मरण होणे याचा अर्थ असा की, आपल्या मेंदूला पुरेसा रक्तपुरवठा होत नाहीये. त्यामुळे मेंदूला रक्तपुरवठा वाढवण्यासाठी प्रयत्न करणं गरजेचं असतं. शारीरिक हालचाली आणि शारीरिक व्यायाम वाढवला, तर संपूर्ण शरीरात रक्तप्रवाह चांगला होत राहतो. मेंदूला होणारा रक्तपुरवठाही शारीरिक व्यायामामुळे सुधारतो. चालणं, पळणं, ॲरोबिक्स करणं, सायकल चालवणं, योगसाधना करणं यांसारख्या शारीरिक क्रियाकलापांतून मेंदूकडील रक्तपुरवठा वाढून, स्मरणशक्ती सुधारते.

पोषणयुक्त आहार घेतल्यास मेंदूची पोषक घटकांची गरज पूर्ण होते. आहारात फळे, सर्व प्रकारच्या भाज्या, धान्ये, डाळी, कडधान्ये, प्रथिनेयुक्त पदार्थांचा समावेश करावा.



# प्रजासत्ताक दिन

भारताला स्वातंत्र्य मिळालं खरं, पण ते प्राप्त करण्यामागे अनेकांचे बलिदान-त्याग अन् परिश्रम होतं.महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गाने लढा दिला, तर क्रांतीवीर भगतसिंग, नेताजी सुभाषचंद्र बोस,वीर सावरकरसारख्या शूरवीरांनी जहाल विचारांची कास धरून इंग्रजांशी सामना केला. अखेर 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळालं अन् ब्रिटिश राजवट संपुष्टात आली.

तथापि, स्वतंत्र देशाचा राज्यकारभार सनदशीर मार्गाने चालविण्यासाठी राज्यघटना तयार करणं क्रमप्राप्त असते. अर्थातच देशाच्या राज्यकारभाराला दिशा दाखविणारा सर्वोच्च कायदा (Basic Law) म्हणजे राज्यघटना होय. नवराष्ट्राची वाटचाल कशी व्हावी; तेथे कशाप्रकारे शासन असावे; कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ, न्याय मंडळ यांचे अधिकार व कार्य प्रणाली कशी असावी; राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ; तसेच राज्यपाल, मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ यांचे अधिकार व कर्तव्य कोणते; नागरिकांचे मूलभूत अधिकार, त्यांच्या रक्षणाची हमी व नागरिकांची कर्तव्ये यासंबंधी मार्गदर्शन करणारा मूलभूत कायदा म्हणजे राज्यघटना होय.

या पार्श्वभूमीवर राज्यघटना तयार करण्यासाठी घटना समितीची स्थापना करण्यात आली. डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी या समितीचे अध्यक्षपद भूषवून, त्यांनी एक मसुदा समितीची नियुक्ती केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. अन् त्यात अन्य सहा सदस्य समितीत होते. मसुदा समितीचे अध्यक्ष भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध देशांचे दौरे करून तेथील राज्यघटनांमधील तरतुदींचा अभ्यास केला. याशिवाय देशांतर्गत विविध राज्यांच्या भाषा, भौगोलिक परिस्थिती व संस्कृतीची माहिती संकलित करण्यासाठी राज्यांचा अभ्यास दौराही केला. प्रत्यक्षात या कामास 29 ऑगस्ट 1947 रोजी सुरुवात झाली अन् सदर काम 2 वर्षे 11 महिने 18 दिवस अविरत चालले. यात 413 कलमे व 12 परिशिष्टे यांचा समावेश करण्यात आला.

अखेर 26 नोव्हेंबर 1949 रोजी घटना समितीने सदर राज्यघटनेचा स्वीकार केला. त्यानंतर लगेच 26 जानेवारी 1950 पासून राज्यघटना अमलात येऊन भारत देश सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य म्हणून नावरूपाला आला. आणि त्याच दिवसापासून स्वतंत्र भारताची राज्यघटना अमलात आली, अन् हिंदुस्थानाने एका नव्या युगात प्रवेश केला. या नवनिर्मित राज्यघटनेच्या माध्यमातून सर्वधर्मीय नागरिकांना मतदानाचा आणि अन्य मूलभूत अधिकार बहाल करण्यात आले. हीच हिंदुस्थानात संसदीय लोकशाहीची खऱ्या अर्थाने मुहूर्तमेढ ठरली.

भारतीय राज्यघटनेची निर्मिती केल्याबद्दल घटना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अभिनंदन केलं. यावेळी भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या महासभेला संबोधित करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "राज्यकर्त्यांनी देशाशी प्रामाणिक राहून भारताचे सार्वभौमत्व, एकता व अखंडता टिकवून ठेवण्यासाठी भरीव योगदान द्यावे. तसेच भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र असल्याने प्रत्येक जाती-धर्माविषयी समान आदरभाव असावा. प्रजासत्ताक राज्य निर्मितीसाठी राजकीय लोकशाहीला सामाजिक व आर्थिक लोकशाहीची जोड द्यावी. राज्यघटना, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा राज्यकर्त्यांसह नागरिकांनी आदर करावा. आपल्या पसंदीचा लोकप्रतिनिधी निवडून देण्यासाठी राज्यघटनेने सर्वधर्मियांना मतदानाचा अधिकार बहाल केला आहे. कुठल्याही नागरिकांवर अन्याय झाल्यास त्याला न्यायालयात दाद मागणे चा मूलभूत अधिकार देण्यात आला आहे". न्यायाचे राज्य निर्माण करण्याचा घटनाकारांचा उद्देश होता, हे सिद्धीस येते.

प्रत्येक भारतीय नागरिकाला आपल्या श्रद्धेनुसार देवाची उपासना करण्याकरिता धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान करण्यात आला. तथापि, राज्य हे कोणत्याही धर्माशी घटनात्मकदृष्ट्या बांधील नाही वा कुठल्याही धर्मात हस्तक्षेप करत नाही. याशिवाय कुठल्याही विषयावर आपले मत व्यक्त करण्यासाठी नागरिकांना घटनेने विचार स्वातंत्र्याचा अधिकार दिला आहे. तथापि, विचार स्वातंत्र्याचा वापर करताना इतरांच्या मूलभूत अधिकारांची पायमल्ली होणार नाही, याची प्रत्येकाने खबरदारी घ्यावी. महत्वाचे म्हणजे आपला उदरनिर्वाह करण्यासाठी नागरिकांना उद्योग-व्यवसाय करण्याचा अधिकार ही बहाल करण्यात आला आहे. स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, स्पृश्य-अस्पृश्य, कामगार-मालक असा भेदाभेद न करता, भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना समान अधिकार-समान संधी प्रदान केली आहे. अत: वरील बाबींकडे पाहिल्यास संसदीय लोकशाही ही खऱ्या अर्थाने आदर्श राज्यपद्धती आहे, हे सिद्ध होते.

घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित भारतीय घटनेत मागासवर्गीयांना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या नोकऱ्यांमध्ये आरक्षण दिलं आहे.इतकेच नव्हे तर, मागास वर्गीय जाती-जमाती, आर्थिकदृष्या दुर्बल घटक, अपंग व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना शैक्षणिक व आर्थिक सवलती, सोयी-सुविधा घटनेच्या माध्यमातून प्रदान करण्यात आल्या आहेत. हॉटेल्स, सार्वजनिक करमणुकीची स्थळे, धार्मिक ठिकाणे येथे भेदाभेद न करता प्रत्येकाला प्रवेश दिला जातो. अस्पृश्यता पाळणे हा फौजदारी गुन्हा आहे, असे कायद्यात नमूद करण्यात आले आहे. घटनेच्या माध्यमातून घटनाकारांनी विविध संप्रदाय, भाषा, पंत, संस्कृती-परंपरा असलेल्या देशात विविधतेतून एकता प्रस्थापित करण्यावर अधिक भर दिला आहे. त्यामुळेच संसदीय लोकशाही ही सर्वधर्मियांसाठी अन् समाजामधील सर्वच थरांतील नागरिकांसाठी वरदान ठरली आहे.

प्रत्येक नागरिकाने देशाप्रती कर्तव्याची जाणीव ठेऊन भारताचे सार्वभौमत्व,अखंडता व एकात्मता यांचे रक्षण करणे; सार्वजनिक संपत्तीची जपवणूक करणे; सांस्कृतिक वारसाचे जतन करणे; अरण्य, सरोवर, नद्या, वन्यजीवसृष्टी या नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे; राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना करणे आणि वेळप्रसंगी देश रक्षणाच्या कार्यात सहभागी होणे, ही मूलभूत कर्तव्ये पार पाडावीत, हा मोलाचा सल्ला घटनाकारांनी नागरिकांना दिला आहे. तात्पर्य, प्रत्येक नागरिकाने भारतीय प्रजासत्ताकाचा सन्मान करून त्याला अधिक मजबूत करण्यासाठी कटिबध्द व्हावे. त्याबरोबरच त्याचे नावलौकिक वाढेल यासाठी सदैव प्रयत्नशील रहावे,म्हणजे भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करणे खऱ्या अर्थानं सार्थक ठरेल. भारतातील सर्वधर्मीय नागरिकांना प्रजासत्ताक दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा! भारतीय प्रजासत्ताक चिरायू होवो!

जय हिंद, जय भारत
जय महाराष्ट्र!

लेखक - रणवीर राजपूत
निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी,
माहिती व जनसंपर्क, मंत्रालय
(मो.न.९९२०६७४२१९)

## गुलेन बॅरी सिंड्रोम

गुइलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) हा एक दुर्मीळ न्यूरोलॉजिकल डिसऑर्डरचा विकार आहे; ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकार कमी होते. या स्थितीमुळे अशक्तपणा, सुन्नपणा आणि गंभीर प्रकरणांमध्ये पक्षाघात होऊ शकतो. गुइलेन बॅरे सिंड्रोम कोणालाही प्रभावित करू शकतो. मात्र, त्याचे नेमके कारण समजलेले नाही. या आजारातून बरे होण्यासाठी प्रत्येक रुग्णाला वेगवेगळा वेळ लागू शकतो. बहुतेक व्यक्ती काही आठवड्यांत बरे होतात; तर काहींना महिनाभराचा कालावधी लागतो. तर गंभीर प्रकरणांमध्ये अर्धांगवायू होऊ शकतो," असे न्यूरोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. पंकज अग्रवाल यांनी सांगितले. या आजाराची लागण झालेले सुमारे ८० टक्के रुग्ण पूर्णपणे बरे होतात, १५ टक्के रुग्णांमध्ये काही काळ अशक्तपणा असू शकतो आणि पाच टक्के रुग्णांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागते. या विकारावर लवकरात लवकर उपचार घेणे गरजेचे असते.

वाशी येथील फोर्टिस हिरानंदानी हॉस्पिटलमधील न्यूरोलॉजीचे विभागप्रमुख डॉ. पवन ओझा म्हणाले की, हा एक 'न्यूरोलॉजिकल इमर्जन्सी' विकार आहे ज्यामध्ये अचानक हात किंवा पायांत अशक्तपणा येणे आणि कधी कधी डोळ्यांच्या हालचाली, गिळणे व बोलण्यात अडचण येते. "त्यामुळे अचानक श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. बऱ्याच रुग्णांना प्रथम हात किंवा पायांत अशक्तपणाचा अनुभव येतो. त्यापैकी काही इतके अशक्त होतात की, ते अन्नही गिळू शकत नाहीत किंवा श्वासही घेऊ शकत नाहीत. रुग्णाची प्रकृती अचानक इतकी बिघडते की, त्याला एक किंवा त्यापेक्षा जास्त दिवसांत श्वासोच्छ्वासासाठी व्हेंटिलेटरवरची गरज भासू शकते. तसेच बहुतेक प्रकरणांमध्ये लक्षणे दिसण्यासाठी सुमारे ४-५ दिवस लागतात," असेही डॉ. ओझा यांनी अधिक माहिती देताना स्पष्ट केले.

गुलेन बॅरी सिंड्रोम कसा होतो?

पोल्ट्रीतील कोंबड्यांचे कच्चे किंवा कमी शिजलेले मांस खाल्ल्याने किंवा हाताळल्याने हा आजार होण्याची शक्यता आहे. हे विषाणू किंवा जीवाणूंना लक्ष्य करण्याऐवजी उलट आपल्या नसांनाच इजा करून रोगप्रतिकार शक्तीवर हल्ला करतात. त्यामुळे मज्जातंतू कमकुवत होऊ लागतात आणि कार्य करू शकत नाहीत," डॉ. ओझा म्हणाले.

सेरेब्रोस्पाइनल फ्लुइड (CSF) तपासणी का केली जाते?

विविध न्यूरोलॉजिकल रोगांचे निदान करण्यासाठी सेरेब्रोस्पाइनल फ्लुइड (CSF) तपासणी आवश्यक आहे, असे हैदराबाद येथील अपोलो हॉस्पिटलचे सल्लागार न्यूरोलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार सांगतात. ते पुढे म्हणाले, "यामध्ये मेंदुज्वर आणि एन्सेफलायटिस यांसारख्या मध्यवर्ती मज्जासंस्थेच्या संसर्गाचा समावेश होतो. जीबीएस हा संसर्गजन्य न्यूरोलॉजिकल आजार असतो आणि त्यामुळे अर्धांगवायू होतो."

गुइलेन बॅरे सिंड्रोमची लक्षणे

गुइलेन बॅरे सिंड्रोमची लक्षणे सहसा अचानक दिसू लागतात. ही लक्षणे काही दिवसांत किंवा आठवडाभरात वेगाने वाढू लागतात. सामान्य लक्षणांमध्ये अशक्तपणा आणि हातापायांना मुंग्या येणे, अंग दुखणे, चालताना तोल जाणे, चेहरा सुजणे, चालताना व गिळताना त्रास होणे, हात-पाय लुळे पडणे यांचा समावेश आहे.

उपचार

उपचारामध्ये इंट्राव्हेन्स इम्युनोग्लोब्युलिन (IVIG) किंवा प्लाझ्मा एक्स्चेंज यांसारख्या इम्युनोथेरपीचा समावेश असतो. यामध्ये मज्जातंतूंचे नुकसान कमी करण्यासाठी या उपचारपद्धतीचा आधार घेतला जातो, असे डॉ. अग्रवाल म्हणाले.

## स्मरण क्रांतिवीरांचे

जे लढले होते तेव्हा
आज ते अस्तित्वात नाहीत,
आहेत जे आज ईथे त्यांना
स्वातंत्र्याचे मोलच नाही

दुःखाची झळ सोसली त्यांनी
भविष्याची पर्वा केली नाही,
सुख आज आम्ही उपभोगतोय
आम्हाला त्यांची कदर नाही...

स्वप्न त्यांच्या डोळ्यातले
पारतंत्र्यात कधी साकारले नाही,
त्यांच्या स्वप्नांचे मूल्य
आम्हाला आज कळणार नाही

रक्त सांडले, फास स्वीकारला
जखमांना कधी कुरवाळले नाही,
ध्यास एकची स्वातंत्र्याचा
मोहाचा स्पर्श होऊ दिलाच नाही...


हसत हसत लढत राहिले
वंदे मातरम् बोलण्यास विसरले नाही,
मृत्यु समोर उभा असतानाही
माघार त्यांना मान्यच नाही

देशाला केले मुक्त जोखडातून
छळाला त्यांनी जुमानले नाही,
लढले ते वीर क्रांतिकारक
स्वातंत्र्याची फळे त्यांनी चाखलीच नाही...

गणतंत्र दिनाच्या या पवित्र क्षणी
त्यांना न स्मरून चालणारच नाही
ते लढले म्हणून आज आहोत आपण
त्यागाविना त्यांच्या आपले अस्तित्वच नाही

ज्योती रावराणे, कांजूरमार्ग, मुंबई

## ठाणे ॲग्रो डीलर असोसिएशनचे अध्यक्ष समीर ठाकरे यांचा सत्कार





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : भिवंडी तालुक्यातील झिडके-अंबाडी नाका येथील सुप्रसिद्ध "पल्लवी कृषी सेवा केंद्राचे" प्रोपायटर- समीर सिताराम ठाकरे यांचा " राष्ट्रीय केमिकल फर्टिलायझर लिमिटेड मुंबई" या कंपनीकडून उत्कृष्ट विक्रेता म्हणून सन-2025/26 या वर्षांचा पुरस्कार जाहीर करण्यात आला,या पुरस्काराचे मानकरी म्हणून समीर ठाकरे यांचा 25 जानेवारी 2025 रोजी मुंबई येथील कार्यक्रमात RCF कंपनीचा " बेस्ट डीलर अवॉर्ड " देऊन सन्मान करण्यात आला.


झिडके-अंबाडी नाका येथे " पल्लवी कृषी सेवा" केंद्र गेल्या 17 वर्षांपासून शेतकऱ्यांच्या सेवेसाठी कार्यरत आहे.या केंद्रामार्फत शेतकऱ्यांना खते,बी बियाणे,कीटकनाशके शासनाच्या निर्देशाप्रमाणे योग्य किंमतीत उपलब्ध करून दिली जातात.तसेच सदर केंद्र हे भिवंडी तालुक्यातील ग्रामीण भागातील असल्यामुळेच शेतकऱ्यांना विविध पिक हंगामात प्रत्येक्ष शेतावर जाऊन योग्य असे मार्गदर्शन केले जाते. त्याबरोबर शेतकऱ्यांसाठी कृषी मेळावे यांचेही आयोजन केले जाते.आदि बाबींचा आढावा घेऊन,पल्लवी कृषी सेवा केंद्र झिडके-अंबाडी नाका यांचे प्रोपायटर समीर ठाकरे यांचा RCF कंपनीकडून जो उत्कृष्ट विक्रेता म्हणून सन्मान केला,तो योग्यच आहे,त्यामुळे परिसरातून समीर ठाकरे यांचे अभिनंदन केले जात आहेत.

## पत्रकार तानाजी लोणे यांना पितृ शोक



कल्याण तालुक्यातील नडगांव गांवातील जेष्ठ नागरिक ह.भ.प.कै.शंकर भिकाजी लोणे यांचे शुक्रवार दिनांक २४/१/२०२५रोजी दुःखद निधन झाले असून कै.शंकर महाराज लोणे हे वारकरी संप्रदायाचे होते. कल्याण तालुक्यात ग्रामीण भाग व गांवात धार्मिक कार्यक्रमात ते हिरारिने भाग घेत असत. नडगांवात अखंड हरिनाम सप्ताहाला कै.शंकर महाराज लोणे यांनी सुरूवात केली .

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते साकेत मैदानावर ध्वजारोहण




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भारतीय प्रजासत्ताकाच्या 76 व्या वर्धापनदिनानिमित्त ठाणे जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजारोहण रविवार, दि.26 जानेवारी, 2025 रोजी पोलीस क्रीडा संकुल, साकेत मैदान, ठाणे येथे सकाळी 9.15 वा. उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

तरी जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, ज्येष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी, प्रसारमाध्यम प्रतिनिधी यांनी मोठ्या संख्येने या राष्ट्रीय कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

# लोकशाही बळकट करण्यासाठी मताधिकार वापरा

## – कमलाकांत म्हेत्रे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मतदान जनजागृती व भारतीय लोकशाही सशक्त/बळकट करण्यासाठी भारतीय संविधान, संसदीय लोकशाही कार्यप्रणाली विद्यार्थ्यांनी समजावून घ्यावी. यासाठीच नागरिक शास्त्राचा समावेश आपल्या शालेय अभ्यासक्रमात आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती,जिल्हा परिषद नगरपालिका, महानगरपालिका,राज्य विधिमंडळाची दोन्ही सभागृहे, विधान परिषद, विधानसभा तसेच लोकसभा निवडणुकीच्या विविध मतदारसंघात केन्द्रीय निवडणूक आयोगाचे व राज्य निवडणूक आयोगाचे अधिकारी, कर्मचारी, शिक्षक मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी समाजात, सामान्य जनतेत जाऊन जनजागृती करतात, यात तुम्ही विद्यार्थ्यीनी सुद्धा सक्रिय सहभाग नोंदवावा. निवडणूकीमध्ये मतदाराने मताधिकार बजावताना कोणत्याही प्रलोभनाला, दबावाला, जातिभेद, धर्म भेद यांना बळी न पडता समाजाचा सर्वांगीण व शाश्वत विकास करणारा लोकप्रतिनिधी निवडावा, अशी अपेक्षा असते. म्हणूनच अठरा वर्षे पूर्ण होताच प्रत्येक भारतीयाने मतदार नाव नोंदणी करावी. व मतदानाचा अधिकार प्राप्त झाल्यावर अत्यंत सतर्क, दक्ष राहून लोकशाही बळकट करावी. यासाठी प्रथम कुटुंबिय, मित्रपरिवार, शेजारी, नातेवाईक यांच्या मध्ये मताधिकारा बाबत जाणीव जागृती करणे गरजेचे आहे. राज्य घटनेने दिलेला मतदान हा केवळ मूलभूत हक्क नसून कर्तव्य व जबाबदारीही आहे. याचे भान आणि जाण आपल्याला असणे आवश्यक आहे असे प्रतिपादन ठाणे महानगरपालिका शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी केले.

मा.भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार 25 जानेवारी हा 15 वा "राष्ट्रीय मतदार दिन" म्हणून साजरा केला जातो. याचे औचित्य साधून सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय ठाणे व ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मतदार दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. यावेळी गटप्रमुख राजेंद्र परदेशी यांनी ही समयोचित मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमास वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण 100 विद्यार्थ्यी उपस्थित होते. तसेच 'मतदान करावे की करू नये, या विषयावर वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. लोकशाहीत लोकमताला महत्त्वाचे स्थान आहे. लोकमताशिवाय लोकशाही अस्तित्वात येते नाही. लोकमत जर विवेकी नसेल, प्रगल्भ नसेल, तर लोकशाही सशक्त होऊ शकणार नाही. मत हे विकासात्मक कार्यक्रमाला-कार्याला, तत्त्वज्ञानाला, विचाराला द्यावयाचे असते. उमेदवार हा या सर्वांचा संरक्षक असतो. हा विचार वादविवादातून स्पर्धेतील विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केला. तसेच राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. मतदान जनजागृती कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश भगूरे, उप. प्राचार्य श्री राजेंद्र वेखंडे, प्रशासकीय उप. प्राचार्य दिनेश जोशी सर यांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी शंकर झंजे यांनी केले.

# बाल विकास प्रकल्पाअंतर्गत 'बेटी बचाओ बेटी पढाओ' मार्गदर्शन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर : बाल विकास प्रकल्प, पालघर नागरी अंतर्गत अंगणवाडी केंद्र वेवूर येथे "बेटी बचाओ बेटी पढाओ" या अभियानाअंतर्गत किशोरवयीन मुलींसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून दिवेश पष्टे (अन्न तंत्रज्ञ व आरोग्य सेवक) उपस्थित होते. प्रवीण मधुकर भावसार, बाल विकास प्रकल्प अधिकारी, यांनी मुलींना मार्गदर्शन केले तर मुख्यसेविका तृप्ती भोये आणि अंगणवाडी सेविका यांनी कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित केला. या कार्यक्रमात 65 किशोरवयीन मुलींनी सक्रिय सहभाग नोंदवला. मुलींना शिक्षण, पोषणयुक्त आहार, आरोग्य, स्वच्छता आणि मासिक पाळी व्यवस्थापन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. किशोरवयीन मुलींना या विषयांची महत्त्वपूर्ण माहिती देत त्यांचे मानसिक, शारीरिक आणि सामाजिक आरोग्य सुधारण्यासाठी प्रेरित करण्यात आले.कार्यक्रमाची प्रमुख वैशिष्टे शिक्षण: शिक्षणाच्या महत्त्वावर भर देत मुलींना आत्मनिर्भर होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. आहार पोषणयुक्त आहारामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणाऱ्या सकारात्मक परिणामांची माहिती देण्यात आली.आरोग्य व स्वच्छता : आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छतेचे महत्त्व आणि त्यासंबंधीच्या मूलभूत सवयी विकसित करण्यावर चर्चा झाली. मासिक पाळी व्यवस्थापन : मासिक पाळीविषयीचे गैरसमज दूर करत याबाबत योग्य मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित किशोरवयीन मुलींनी आपले प्रश्न विचारून शंकाचे निरसन केले. अशा उपक्रमांमुळे मुलींच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते तसेच त्यांच्या उज्वल भविष्याला आधार मिळतो. असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. या कार्यक्रमात मुख्यसेविका, अंगणवाडी सेविका आणि बाल विकास प्रकल्प पालघर नागरी यांचा सहभाग कौतुकास्पद असून त्यांनी किशोरवयीन मुलींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी पुढाकार घेतला.




## उल्हासनगर मनपा आयुक्तांकडून

# बांधकाम विभागाची झाडाझडती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : महापालिकेच्या आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी पदभार स्वीकारताच शहरातील रखडलेल्या कामांचे पाहणी दौरे सुरू केले आहेत. याच दरम्यान शहरातील अनेक महिन्यां पासून खोदुन ठेवलेल्या मुख्य रस्त्यांपैकी ७ रस्त्यांची पाहणी नुकतीच त्यांनी केलीय. रखडलेले ते रस्ते पूर्णत्वाकडे न गेल्याने नागरिकांना रहदारी खोळंबा व धुळीचा सामना करावा लागतोय. या प्रकरणी आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी सार्वजनिक बांधकामाच्या अधिकाऱ्यांची झाडाझडती सुरू केलीय. संबंधित बेजबाबदार ठेकेदार आणि अस्वच्छतेवर नियंत्रण न ठेवू शकणार्या स्वच्छता निरीक्षकांना आयुक्तांनी नोटीसा बजावल्या आहेत.

एमएमआरडीएच्या या ७ अपूर्ण रस्त्यांबाबत आक्रमक आयुक्तांनी तातडीने एमएमआरडीएच्या अधिकार्यांची बैठक लावण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभाग शहर अभियंता तरूण शेवखानी यांना दिलेत.

पाहणी केलेले ते मुख्य ७ रस्ते

१) नेताजी चौक ते कुर्ला कॅम्प मार्गे कैलास कॉलनी,

२) न्यू इंग्लिश हायस्कूल ते पेट्रोल पंप, हिललाईन पोलीस स्टेशन मार्गे लालचक्की,

३) ए-ब्लॉक ते साईबाबा मंदिर, डॉल्फिन क्लब मार्गे सेंच्युरी ग्राउंड,

४) सोनार चौकातून कोयंडेचा पुतळा,

५) हिरा घाट मंदिर ते डर्बी हॉटेल,

६) शामा प्रसाद मुखर्जी चौक ते विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन मार्गे शांतीनगर,

७) वॉक्को कंपाऊंड ते व्हिटीसी ग्राउंड मार्गे व्हीनस चौक हे सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते एमएमआरडीएच्या वतीने तयार करण्यात येत आहेत. यातील काही रस्त्यांचे काम प्रगतीपथावर असून ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामास गती मिळत नसल्याने काही रेंगाळलेल्या अवस्थेत आहेत.

यावेळी अतिरिक्त आयुक्त किशोर गवस, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शहर अभियंता तरुण शेवकानी, पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता परमेश्वर बुडगे, उपअभियंता दीपक ढोले, जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे, कनिष्ठ अभियंता हर्षद प्रधान, पल्लवी वैरागर उपस्थित होते.

गोल मैदान येथील प्रस्तावित कामाचे प्रकल्प नकाशे व संपूर्ण कामाचे उमपा नियुक्त सलागार यांच्या द्वारे पिपीटी सादरीकरण करावे, एमएमआरडीएच्या वतीने सुरु असलेल्या ७ रस्त् कामे जलद गतीने होण्याकरिता दैनंदिन स्थळ पाहणीचे फोटो काढून आपापल्या व्हाट्सअप ग्रुप वर पाठवावेत, महानगर पालिकेच्या कामाच्या मधील अतिक्रमण हटवणे, झाडे कापणे, ड्रेनेज पाईप्स, इ. कामांना वेग द्यावा

, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यांचे व्यवस्थीतरित्या बॅरेकेटीग करणे, कामाचे नाव, संबंधीत विभाग, कामाची फलक लावणे आदी सुचना

आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी अधिकार्यांना दिल्या आहेत.

'स्वच्छता निरीक्षकांची झाडाझडती ..पाहणी दरम्यान आयुक्तांना गोल मैदान परिसर, व्ही.टी. सी. ग्राउंड रोड, स्वर्गद्वार स्मशानभूमी या ठिकाणी कचरा दिसून आल्यामुळे संबंधित स्वच्छता निरीक्षक ह्यांना नोटीस बजाविण्यात आल्या आहेत. शहरात दैनंदिन साफसफाई, स्वच्छते ची कामे झाली नाहीत तर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल असा सज्जड दम ही आयुक्तांनी स्वच्छता निरीक्षकांना दिलाय.

# शिवसेना उबाठा गटाने घेतली आयुक्तांची भेट



विविध समस्यांबाबत दिले निवेदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शिवसेना उध्दव ठाकरे गटाच्या वतीने उपनेते विजय साळवी यांच्या नेतृत्वाखाली कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ इंदुराणी जाखड याची भेट घेतली. यावेळी विविध समस्यांबाबत चर्चा केली व निवेदन सादर केले. आयुक्त डॉ इंदुराणी जाखड यांनी सांगितले की, आपल्या ज्या समस्या आहेत त्या सोडवण्यासाठी आपण प्रयत्न करु,तसेच काही समस्या आमच्या आपण निदर्शनास आणून दिल्या आहेत त्या बाबत संबंधित अधिकारी यांना सूचना देण्यात येतील असे सांगितले.

यावेळी उपनेते विजय साळवी यांनी सांगितले की छत्रपती शिवाजी महाराज चौकात, सहजानंद चौकात वाहतूक कोंडी होते, तेथे सिग्नल यंत्रणा नाही त्यामुळे रस्ता ओलांडून जाणयासाठी कसरत करावी लागते. यासाठी महापालिका प्रशासनाने उपाययोजना करणे गरजेचे आहे, तसेच कचरा गाडया काही खराब झाल्याने रस्त्यावर कचऱ्याचे पाणी सांडते व दुर्गंधी पसरते. तसेच मोहना कल्याण रिंगरोड बस सुरु करण्याचे लेखी पत्र परिवहन विभागाकडून देण्यात आले होते, परंतु आज पयैत रिंगरोड बस सेवा सुरू केली नाही.

तसेच पूर्वी खडकपाडा सर्कल अतिशय सुंदर होता. नागरिक बघण्यासाठी येत होते. परंतु आता बकाल झाला आहे, चारही बाजुला फेरीवाले यांनी वेढला आहे, तसेच चालायला फुटपाथ हि नाही, तसेच कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात वाहतूक कोंडी होत आहे. यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे, तसेच सुचना फलक लावणे गरजेचे आहे. महत्त्वाचे म्हणजे महापालिका प्रशासना कडून प्लास्टिक पिशवी वर कारवाई केली जाते, परंतु आपले कर्मचारी हे फक्त भाजी विक्रेते, फुलं विक्रेते, मच्छि व दुध विक्रेते यांच्यावर कारवाई करतात.

प्रामुख्याने होल सेल व दुकानदार विक्रेते यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे, परंतु महापालिका प्रशासना तसे करीत नाहीत. जर होलसेल विक्रेत्यांवर कारवाई केली तर प्लास्टिक पिशवीच बंद होतील, तसेच महापालिका कडून ट्राफिक वार्डन,ट्राफिक पोलिसांच्या जोडीला दिले आहेत, ते बिचारे कामे करतात तर ट्राफिक पोलीस आरामशीर बसतात याबाबत हि चौकशी केली पाहिजे. तसेच कल्याण दुर्गाडी किल्ल्याच्या आजुबाजुचा परीसर स्वच्छ केले पाहिजे असे सांगितले.

यावेळी शिवसेना उपनेते विजय साळवी, भिवंडी लोकसभा प्रमुख साईनाथ तारे, दत्ता खंडागळे, विजय काटकर, सतिश वायचल, निलेश भोर, राजु दिक्षित, दिनेश शेटे, मारुती नांगरे,यांच्या सह आदी उपस्थित होते.

# ठाणे शहर कॉंग्रेसचे निषेध आंदोलन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये निवडणूक आयोगाच्या कृत्यांविरोधात, लोकशाहीचे रक्षण तसेच मतदारांच्या हक्कासाठी ठाणे शहर जिल्हा कॉंग्रेसच्या वतीने कॉंग्रेस कार्यालयाच्या ठिकाणी आज शनिवारी तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. 25 जानावारी रोजी राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या आदेशानुसार ठाणे शहर कॉंग्रेस अध्यक्ष ॲड. विक्रांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेश कार्याध्यक्ष मो. नसीम खान, प्रदेश उपाध्यक्ष राजेश शर्मा आदींच्या नेतृत्वाखाली घोषणाबाजी करत हे निषेध आंदोलन करण्यात आले. यात हिंदूराव गळवे, राहुल पिंगळे यांच्यासह सर्व प्रदेश पदाधिकारी, ब्लॉक अध्यक्ष, महिला कॉंग्रेस पदाधिकारी, युवक कॉंग्रेस पदाधिकारी, सर्व प्रभाग अध्यक्ष, वॉर्ड अध्यक्ष आणि सर्व कॉंग्रेस कार्यकर्ते या आंदोलनात सहभाग झाले होते. महाराष्ट्रात नोव्हेंबर 2024 मध्ये विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या आणि निवडणुकीचे निकाल पाहता ते अनाकलनीय, आश्चर्यकारक, अविश्वसनीय व काहीतरी गडबड असल्याचे दिसले. राज्यातील राजकीय परिस्थिती ही सत्ताधारी भाजपा युतीच्या विरोधात होती. सहा महिन्यापूर्वीच लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी पक्षाचे पानिपत झाले होते व महाविकास आघाडीला घवघवीत यश मिळाले होते, अवघ्या सहा महिन्यात हे चित्र पूर्णपणे पालटले जाऊ शकते यावर कोणाचाच विश्वास बसणार नाही. मतदारयाद्यांमध्ये घोटाळा करण्यात आला, याविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार करुनही त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले, त्यानंतर निवडणूक निकालातही घोटाळा करण्यात आला. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या सहा महिन्याच्या अंतरात तब्बल 50 लाख मतांची वाढ कशी झाली? मतदानादिवशी संध्याकाळी 5 वाजता जाहिर केलेली मतदानाची टक्केवारी व निवडणूक आयोगाने दुसरया दिवशी सकाळी जाहीर केलेली टक्केवारी यातमध्ये मोठी तफावत आहे. यातही 76 लाख मतदान वाढलेले दाखवले आहे. सर्व मतदान केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेल्यांची व्यवस्था होती. त्यामुळे मतदारयाद्यातील घोळ, रात्रीच्या अंधारात



वाढलेले 76 लाख मतदान याचे पुरावे निवडणूक आयोगाने द्यावेत अशी मागणी कॉंग्रेस पक्षाने केली असता आजपर्यंत ही माहिती देण्यात आलेली नाही. 25 जानेवारी हा 'राष्ट्रीय मतदार दिवस' म्हणून साजरा केला जात आहे. या दिवसाचे औचित्य साधून कॉंग्रेस पक्ष निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभाराचा पर्दापाश करत आहे. निवडणूक आयोगाने पक्षपातीपणा न करता निष्पक्ष व पारदर्शक निवडणुका घेण्याचे आपले कर्तव्य पार पाडावे तसेच लोकशाहीचे रक्षण आणि मतदारांचा आदर, सन्मान तसेच विश्वास कायम ठेवून विश्वासार्हता अबाधित राहिल याकडे निवडणूक आयोगाने लक्ष द्यावे अशी विनंती यावेळी करण्यात आली. यानंतर कॉंग्रेस कार्यालय पत्रकार परिषद झाली. प्रदेश कार्याध्यक्ष मो. नसीम खान यांनी या पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की, निवडणुका या निष्पक्षपाती व पारदर्शकपणे घेणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्यच आहे, ही संवैधानिक संस्था स्वायत्त आहे पण मोदी सरकारने सर्वच संवैधानिक संस्थामध्ये हस्तक्षेप केला आहे. सध्याचे निवडणूक आयुक्त राजीवकुमार हे भाजपाचे कार्यकर्ते असल्यासारखे वागत आहेत असा आरोप करून महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका या निष्पक्षपातीपणे व पारदर्शकपणे झालेल्या नाहीत असा आरोप केला. लोकसभा निवडणुकीत झालेले मतदान व त्यानंतर अवघ्या सहा महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदार याद्यात घोटाळा करण्यात आला असे सांगून निवडणूक आयोगाचा कारभार संशयास्पद असल्याचे सांगितले.

# बेकायदा नळजोडण्यांवर भिवंडी मनपाची कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
भिवंडी(प्रतिनिधी) : भिवंडी महापालिकेच्या परवानगीविना रस्ते खोदून बेकायदा मलनिस्सारण वाहिनी टाकण्याबरोबरच बेकायदा नळजोडणी घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. भिवंडी येथील नागाव भागातील एका नागरिकाने पालिकेचा रस्ता खोदून मलनिस्सारण वाहिनी टाकली. त्यासाठी संबंधित नागरिकाने पालिकेची कोणतीच परवानगी घेतली नाही. त्याचबरोबर त्याने पालिकेच्या जलवाहिनीला छिद्र पाडून एक व्यासाच्या दोन बेकायदा नळजोडण्या घेतल्या होत्या. हि बाब निदर्शनास येताच महापालिका प्रशासनाने नारपोली पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार संबंधित नागरिकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

भिवंडी येथील निजामपुरा भागातील नदीनाका परिसरात एका नागरिकाने पालिकेच्या परवानगी विना रस्ता खोदून ७ बेकायदा नळजोडण्या घेतल्या होत्या. ही बाब सुद्धा निदर्शनास येताच पालिका प्रशासनाने निजामपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार, एका व्यक्तीविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असू त्यालाही अद्याप अटक करण्यात आलेले नाही.

# आ.ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या निधीतून शाळांना शैक्षणिक साहित्य



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे : कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे सरांच्या स्थानिक विकास निधीमधून मागच्या वर्षाचे 5 कोटी आणि या वर्षाचे 5 कोटी असे 10 कोटीचे कोकणातील सर्व अंशत अनुदानीत आणि 100% अनुदानीत शाळांना डिजिटल ई लर्निंग इक्विपमेंट साहित्याचे वाटप केले आहे. त्यामध्ये सन 2023-24 मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील 177 शाळांना डिजिटल ई लर्निंग इक्विपमेंट शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले होते आणि या वर्षाच्या सन 2024-25 वर्षाच्या आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांमधून 176 शाळांना असे रत्नागिरी जिल्ह्यातील 353 शाळांना 1 कोटी 87 लाखाचे डिजिटल ई लर्निंग इक्विपमेंटचे साहित्य वाटपाचा कार्यक्रम रत्नागिरी जिल्ह्यात लांजा, राजापूर, रत्नागिरी, संगमेश्वर, गुहागर, चिपळून, खेड, दापोली आणि मंडणगड या 09 तालुक्यात दि. 21 व 23 जानेवरी 2025 रोजी संपन्न झाला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व शाळा ह्या डिजिटल झाल्या असून अंशत व 100% अनुदानित पैकी एकही शाळा डिजिटल झाल्यापासून वंचित राहिलेली नाही.

शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना आमदार शेखर निकम, माजी आमदार विनय नातू, श्रीराम एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रशांत देवळेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख शशिकांत चव्हाण, भाजपाचे माजी अध्यक्ष संजय बुटाला, शिवसेना तालुकाप्रमुख सचिन धाडवे, शालेय समितीचे चेअरमन राकेश बुटाला, भाजपाचे तालुकाध्यक्ष अनिकेत कानडे, भाजपा शहराध्यक्ष ऋषिकेश मोरे, भाजपा पदाधिकारी भूषण काने, सिद्धेश लाड, मल्लेश लकेश्री, मुख्याध्यापक कांबळे, मंगेश गोरीवले, संजय चव्हाण, संजीव वाघमारे, आशिष खातू, अनंत साळवी, गलांडे सर, मोरुजकर, कल्पेश दळवी,संदेश राऊत, आयुब मुल्ला, पोपट जगताप, प्रशांत खेडेकर, सत्यनारायण मिश्रा, संतोष हजारे, भगत सर, उत्तम कांबळे, उल्हास बाळ आणि सर्व लाभार्थी शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

सदर शैक्षणिक साहित्य अतिशय दर्जेदार असून सोबत 10 वी पर्यंतच्या सर्व इयत्तांचा अभ्यासक्रम लोड केलेला आहे. प्रोजेक्टर मोव्हेबल असून प्रत्येक वर्गावर्गातून हवे तेव्हा शिक्षकांना वापरता येईल. यु ट्युब कनेक्ट करण्याचीही सोय आहे. दवर्षी अभ्यासक्रम अपडेट केले जाईल. पाच वर्ष मेंटेनन्स फ्री असणार आहे. याचा सर्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिक्षकांकडून लाभ मिळणार आहे. या साहित्याचा उपयोग अध्ययन व अध्यापन प्रक्रिया सुलभतेने व प्रभावीपणे होण्याकरिता होणार आहे, तसेच आनंददायी शिक्षण खऱ्या अर्थाने सर्व शाळांमध्ये दिले जाईल, शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, आणि संत व अन्य महात्म्यांचे प्रबोधन करणारे पिक्चर दाखवून संस्कृती जोपासली जाऊ शकते, व उत्तम प्रबोधन सुद्धा घडून येऊ शकते, तसेच साऊंड सिस्टीम करेको सिस्टीम असल्याने व यूट्यूबच्या साह्याने ट्रॅक जोडून विद्यार्थ्यांना गाणी भडभड गीते व कविताही शिकवता येतील व शाळेची गुणवत्ता वाढण्यासाठी मदत होईल.

# मैत्रेय मोकलला पॉवर लिफ्टिंगमध्ये ब्रॉन्झ पदक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण : नुकत्याच छत्तीसगड येथे पार पडलेल्या नॅशनल पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत जसखार-उरण येथील मैत्रेय गणेश मोकल याला ९३ किलो वजनी गटामध्ये तिसरा क्रमांक मिळाला असून मैत्रेय याने ब्रॉन्ज पदकाची कमाई केल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

मैत्रेय याला लहानपनापासून पॉवरलिफ्टिंग आवड असल्याने आजवर त्याने विविध ठिकाणच्या स्पर्धेत ब्राँझ, सिल्वर, गोल्ड पदक मिळवून आपल्या नावलौकीक कला आहे. या आगोदर जळगाव येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत चमकदार कामगीरी करून गोल्ड मेडलवर आपले नाव कोरले आहे. या यशानंतर १६ जानेवारीला छत्तीसगड येथे पार पडलेल्या नॅशनल पॉवरलिफ्टिंग चॅम्पियन स्पर्धेसाठी मैत्रेय याची निवड करण्यात आली होती. यावेळी त्याने ब्रॉन्ज पदकाची कमाई केली असल्याने मंत्रय मोकल याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे त्याने सिनिअर ९३किलो वजनी गटात सहभाग घेऊन ६१० किलो वजन उचलून ब्रॉन्ज पदक पटकावलेआहे.

# कबुतरांच्या अतिरिक्त खाद्यावर उल्हासनगर मनपाची बंदी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर : मुक्तपणे फिरणाऱ्या कबुतरांना अन्नधान्य किंवा इतर खाद्यपदार्थ देवुन पुण्य कमवण्याचा सध्या ट्रेंड सुरू आहे. मात्र, अतिरिक्त खाद्य दिल्याने कबुतरांच्या स्वास्थ्याची समस्या तर निर्माण होतेच, त्यासोबत त्यांच्या थव्याने मोठ्या प्रमाणात केलेल्या मलमुत्र मिश्रित घाणीमुळे मानवास अनेक अपायकारक आजारांचाही धोका संभवतो. यासाठी, उल्हासनगरचे आमदार कुमार आयलानी यांनी महानगर पालिकेच्या आरोग्य विभागास पत्र देऊन यावर प्रतिबंधात्मक उपाय योजण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने आता सार्वजनिक स्थळी कबुतरांना उघड्यावर अतिरिक्त खाद्यपदार्थ टाकण्यास मनाई करण्यात आली आहे.

उल्हास नगरातील शहाड उड्डाण पुल, शिवमंदिरच्या आसपास, आणि अनेक सार्वजनिक मोकळया जागा, मंदिरां जवळ नागरिक हे कबुतरांना धान्य, ब्रेड, पावाचे तुकडे, फरसाण यासारखे खाद्यपदार्थ कबुतरांना खाऊ घालतात. साधू वासवानी टॉवर कॉम्प्लेक्समध्ये हे प्रमाण आहे. हे कबुतरांना अपायकारकच आहे परंतु, मानवांना ही दमा, अस्थमा व ईतर संसर्गजन्य रोगांना आमंत्रण देणारे आहे. हि रहिवाशांची तक्रार कुमार आयलानी यांनी महापालिकेच्या निदर्शनास आणून दिली.

याची दखल घेत परिसर स्वच्छ ठेवणे व त्याची योग्य विल्हेवाट लावण्या साठी मुख्य स्वच्छता निरीक्षक एकनाथ पवार यांनी कबुतरांना चारा न देण्याच्या सूचना देणारे फलक लावून तेथे स्वच्छता निरीक्षकांची नियुक्ती केलीय. आता तेथील कबुतरांना चारा देण्याचे प्रमाण जवळपास शून्यावर येत असून, परिसराची नियमित स्वच्छताही होतेय. पालिकेने केलेल्या या तत्पर कारवाईचे आमदार कुमार आयलानीं सस स्थानिकांनी कौतुक केलंय. या इशाऱ्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे एकनाथ पवार यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले आहे.







# पालघरमध्ये 'सायबर मुक्त गाव' मोहिमेचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/पालघर: सध्याच्या डिजिटल युगामध्ये सायबर गुन्हेगारी वाढत असून अनेक नागरिक सायबर गुन्हेगारीच्या जाळ्यात अडकत आहेत. सायबर गुन्हेगारीच्या माध्यमातून होणारी फसवणूक आर्थिक दहशतवाद असून नागरिकांमध्ये सायबर साक्षरता निर्माण करणे तसेच फसवणूक झाल्यास अशा प्रकरणांचा छडा लावण्यासाठी व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने पालघर जिल्हा पोलिसांनी सायबर गुन्हे मुक्त गाव मोहीम राबवण्याचे योजिले आहे. या नागरिक व पोलिसांमध्ये समन्वयक म्हणून या योजनेअंतर्गत जिल्ह्यात सायबर कमांडो व सुमारे ८०० सायबर योद्धा निर्माण करण्यात येणार आहेत. पालघर जिल्ह्यात सुमारे ७७ टक्के नागरिक आदिवासी असून मोबाईल फोन व इंटरनेटचा वापर करताना वेगवेगळ्या अमिषांना बळी पडून फसवणूक होत असल्याचे दिसून आले आहे. पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या संकल्पनेतून जनसंवाद अभियाना अंतर्गत जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सायबर गुन्हे मुक्त गाव मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

सायबर पोलीस स्टेशनची उभारणी

पालघर जिल्ह्यात सायबर गुन्हेची उकल प्रभावीपणे व्हावी म्हणून पालघर जिल्ह्यात पुढील महिनाभरात सायबर पोलीस स्टेशनची उभारणी करण्यात येणार आहे. यामध्ये सायबर गुन्ह्यांची उकल करण्यासाठी विविध सायबर टूल्सने सुसज्ज असणारी सायबर लॅब उभारण्यात येणार आहे.










'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी